**विशेष दिवाणी दावा नं.१०९/२०२३(नि.२०१ लगत)**

**जादा सरतपास वादीतर्फे ॲड. एम. एस. आठल्ये यांच्यातर्फे :**

१. मला आता नि.क्रं.१२४ वरील साठेखत दाखविणेत आले. त्यावर स्टॅम्प विक्रेते म्हणुन माझे वडील विश्वनाथ शंकर नेवसे यांचे नाव आहे. सदर साठेखताचा दस्त माझ्या वडिलांच्या हस्ताक्षरातील आहे. त्यावर दस्तुर म्हणुन माझ्या वडिलांची सही आहे.

२. मला आता नि.क्रं.१२७ वरील संमत्तीपत्र दाखविणेत आले. त्यावर स्टॅम्प विक्रेते म्हणुन माझी सही आहे. त्यावर ओळख घालणार म्हणुन कुणाची सही आहे हे मला सांगता येणार नाही. मला आता नि.क्रं.१२८ वरील संमत्तीपत्र दाखविणेत आले. त्यावर स्टॅम्प विक्रेते म्हणुन माझी सही आहे. त्यावर ओळख घालणार म्हणुन देखील माझी सही आहे. मला आता नि.क्रं.१२९ वरील संमत्तीपत्र दाखविणेत आले. त्यावर स्टॅम्प विक्रेते म्हणुन माझ्या वडिलांचे नाव आहे. त्यावरील हस्ताक्षर माझ्या वडिलांचे आहे.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. जी. एस. भोसले यांच्यातर्फे -**

३. मी स्टॅम्प विक्री करण्याकरीता आवश्यक असणारा कोर्स केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की स्टॅम्प विक्रेता म्हणुन परवाना घेताना मुलाखत होती. हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प विक्रीचा परवाना जिल्हा मुद्रांक अधिकारी देत असतो. हे म्हणणे खरे नाही की मी आजअखेर त्यांच्याकडे परवान्यासाठी अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२४ मध्ये माझा व माझ्या वडिलांचा स्टॅम्प विक्रीचा परवाना नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प विकत घेणाऱ्याची त्यावर सही अथवा अंगठा असतो. हे म्हणणे खरे आहे की त्याचे रजिष्टर मी या कामात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर रजिष्टर दाखल करणेस मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की स्टॅम्प विकत घेणारा जर अंगठा करणारा असेल तर त्याच्या नातेवाईकाची सही, आधारकार्ड, पॅनकार्ड अथवा इलेक्शन कार्डची प्रत घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की नकुसाबाई भगवानराव बलोधी या नावाचे हस्ताक्षर माझ्या वडिलांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२४ वरील पान क्रं.१ वरील अंगठा हा नकुसाबाई भगवानराव बलोधी हिचा आहे व 'हा अंगठा' असा शब्द कुठेही नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याठिकाणी तारीख

देखील नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की तो स्टॅम्प कशाकरीता खरेदी केला हे देखील नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२४ वरील पान क्रं.२ वरील अंगठा हा नकुसाबाई भगवानराव बलोधी हिचा आहे व 'हा अंगठा' हा शब्द कुठेही नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याठिकाणी तारीख देखील नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की पान क्रं.४ ते ८ वरील स्टॅम्प माझ्या वडिलांकडुन खरेदी केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे मला त्यातील काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की पान क्रं.१ ते ८ वरील अंगठयात व पान क्रं.९ वरील अंगठयात फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की पान क्रं.९ व १० वरील अंगठा चौकोनी आहे. हे म्हणणे खरे आहे की पान क्रं.१ ते ८ वरील अंगठयाच्या आकारात व पान क्रं.९ व १० वरील अंगठयाच्या आकारात फरक आहे. हे मी सांगु शकत नाही की पान क्रं.१ वरील अंगठयाच्या रेषा खालुन वर गेलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडिलांची सही विश्वनाथ शंकर नेवसे अशी पुर्ण असते. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२४ वरील पान क्रं.१ ते ११ वरील अंगठयाच्या बाजुला कुठेही विश्वनाथ शंकर नेवसे अशी पुर्ण सही नाही. हे म्हणणे खरे आहे की सुमन गणपत आणि नथु भिकाजी कांबळे हे हस्ताक्षर एकाच शाईचे आहे. हे मला सांगता येणार नाही की सुमन गणपत व नथु भिकाजी कांबळे यांच्या बोगस सहया आहेत.

४. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२७ वरील केवळ स्टॅम्प माझ्याकडुन घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा परवाना क्रं.७/९६ ची प्रत मी दाखल केलेली नाही. सदरचा स्टॅम्प दि.०९.०८.२००४ रोजी घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरचा स्टॅम्प मला २ जुलैला मिळालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की दि.०९.०८.२००४ रोजी मी स्टॅम्प लिहला हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की स्टॅम्प वर खरेदीच्या दिवशीचा शिक्का असतो. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्तातील मजकुर मी टाईप केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की महिन्याअखेरीस उरलेले स्टॅम्प किती आहेत व किती रकमेचे आहेत याची नोंद असते. हे म्हणणे खरे आहे की शिल्लक असलेल्या स्टॅम्पची माहिती आम्ही रजिष्ट्रारला कळवितो. सन २००४ मधील रजिष्टर मी दाखल करु शकतो.

५. नि.क्रं.१२८ वरील दस्ताचा स्टॅम्प हा दि.१८.०६.२००४ रोजीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यातील मजकुराशी वैयक्तीक माझा संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की

अ.नं.२९० मधील ९ आकडयात खाडाखोड आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यातील '०' आकडयातील शाई वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे आहे की एक '०' मोठया अक्षरात आहे व दुसरा '०' लहान अक्षरात आहे. हे म्हणणे खरे नाही की एक '०' गोलाकारात आहे व दुसरा '०' डी आकारात आहे. हे म्हणणे खरे नाही की मी त्यामध्ये खाडाखोड करुन जुनचा ऑगस्ट महिन्यात दस्त केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.२ मधील नमुद असलेल्या मजकुराशी माझा वैयक्तीक काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२८ वर माझी कुठेही सही नाही. माझी नि.क्रं.१२८ वरील स्टॅम्प विक्रेता म्हणुन सही आहे. हे म्हणणे खरे नाही की स्टॅम्प विक्रेता म्हणुन माझी सही व पाठीमागील बाजुची सही एकसारखी नाही. संमत्तीपत्र पासुन लिहुन देणार पर्यंत असलेल्या मजकुराशी माझा संबंध नाही हे म्हणणे खरे नाही. संमत्तीपत्र मी स्वत: टाईप केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की संमत्ती देणार व संमत्ती घेणार यांचे नाव व सहयांचा मजकुर मी लिहलेला नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की नि.क्रं.१२९ वरील स्टॅम्पवर ट्रेझरीचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की सदरचा दस्त माझ्यासमक्ष झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यावरील अंगठे कुणी व कुठे बांधले याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२४ व १२९ वरील दस्तांमधील हस्ताक्षर माझ्या वडिलांचे आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर स्टॅम्प माझ्या वडिलांनी लिहलेला आहे असे त्यावर नमुद केलेले नाही. दस्तुर म्हणुन वडिलांची सही आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२९ वरील स्टॅम्प माझ्या वडिलांनी लिहला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की सामान्यत: ज्यांनी दस्त लिहला त्याचा उल्लेख दस्तामध्ये केलेला असतो. हे म्हणणे खरे नाही की तसे लिहणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२४ मधील मजकुर माझ्या वडिलांनी लिहला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.क्रं.१२७ वरील दस्ताबाबत मी सरतपासात जो मजकुर नमुद केला आहे तो खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील परिच्छेद क्रं.३ या मजकुराशी माझा काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.३ मध्ये मी स्टॅम्प विक्रेता व ओळख घालणार म्हणुन आहे असा मजकुर नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.५ मधील मजकुराशी माझा वैयक्तीक काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की सरतपासातील परिच्छेद क्रं.४ वरील वडीलांचे मृत्यु दिनांकाव्यतिरीक्त इतर मजकुराशी माझा

वैयक्तीक संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी कागदपत्रे तयार करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक :०१.११.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.